प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
RBI On Internet: http://www.rbi.org.in
हिन्दी वेबसाइट http://www.rbi.org.in/hindi
Email: helpprd@rbi.org.in

प्रेस सम्पर्क प्रभाग, केंद्रीय कार्यालय, पोस्ट बॉक्स 406, मुंबई 400 001
फोन: 2266 0502 फैक्स: 2266 0358, 2270 3279

PRESS RELATIONS DIVISION, Central Office, Post Box 406, Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

**दिनांक : ३१ ऑगस्ट, २००६**

**तारका-मालिकेच्या (स्टार सिरीज) बँकनोटा प्रसृत करणे**

भारतीय रिझर्व्ह बँक लवकरच तारका मालिकेतील बँक नोटा देणे सुरु करणार आहे. सुरुवातीला या नोटा महात्मा गांधी मालिकेमधील रु.१०, रु. २०, व रु.५० च्या असतील. तारका मालिकेमधील या नोटा दिसण्यात सध्याच्या बँकनोटांप्रमाणेच असतील, परंतु त्यात एक अतिरिक्त लक्षण / खूण असेल. ती म्हणजे त्या नोटेमधील क्रमांक-पट्ट्यांमध्ये उपसर्ग (प्रिफिक्स) व नोटेचा अनुक्रमांक यामध्ये * असा तारा असेल. त्यामुळे रिझर्व्ह बँकेद्वारा दिल्या गेलेल्या नवीन बँकनोटांच्या पॅकेटमध्ये काही नोटा मात्र वरील प्रमाणे, उपसर्ग व अनुक्रमांक यांच्यामधील जागेत तारा असलेल्या असू शकतील. या पॅकेट्सवर लावलेल्या पट्ट्यांवरुन त्या पाकिटात अशा तारका-मालिकेतील नोटा असल्याचे कळेल. अशा तारका-मालिकेतील प्रत्येक पॅकेट्समध्ये तारका-मालिकेतील १०० नोटा ठेवलेल्या असतील. तारका-मालिकेतील या बँक नोटा, हे वैध चलन असून जनतेने या बँक नोटा मुक्तपणे स्वीकाराव्यात व त्यांचा वापर करावा.

रिझर्व्ह बँकेने सध्या दिलेली बँक नोट-पाकिटे १ ते १०० असे अनुक्रमांक टाकलेली असतात. प्रत्येक बँकनोटेवर स्पष्टपणे उपसर्गासह (प्रिफिक्स) एक अनुक्रमांक टाकलेला असतो. सध्या कोणत्याही पाकिटातील सदोष छापलेल्या बँकनोटा, नोटा छापणाऱ्या छापखान्यात, सदोष नोटांवरील ते-ते अनुक्रमांक टाकले जाऊन बदलल्या जातात. त्यामुळे त्या पाकिटातील नोटांचे अनुक्रमांक अबाधित राहतात. या कार्यरितीमुळे अतिरिक्त वेळ / खर्च आणि मनुष्यबळ वापरले जाते.

आंतरराष्ट्रीय अशा चांगल्या कार्यरिती अंगिकारण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून आणि योग्य खर्चात व अधिकतर कार्यक्षमतेने नोटा छपाईची यंत्रे चालविण्यासाठी, रिझर्व्ह बँकेने, सदोष रीतीने छापलेल्या नोटा बदलण्यासाठी तारका मालिका अनुक्रमांक पध्दत स्वीकारली आहे. २००६-०७ च्या वार्षिक धोरण निवेदनात, या वर्षी एप्रिलमध्ये ही घोषणा करण्यात आली.

अल्पना किल्लावाला,
प्रमुख महाव्यवस्थापक

प्रेस रिलीज : २००६-२००७/३०७